क्रमांक : ७९

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

### गुरुवार, दिनांक १३ जुलै, २०२३ / आषाढ २२, १९४५ (शके)

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**७९.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग - २ व्दवारे दिनांक सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १८ निवेदने सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ व्दवारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. १८० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३५ निवेदने सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. त्यापैकी १४५ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३३ निवेदने सोमवार, दिनांक ०३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७४ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. आता एकूण ११२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १४ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : **१३ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

<u>याची प्रत</u> :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

\\MLS-DATASERVER\F Branch\१-०८ PC data\२०२२ THIRD SESSION\Calling attention/Lakshvedhi Nivedan Vitrit

03

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्रमांक १७१२

श्री. सुनील राणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी

मानवतावादी दृष्टीकोनातून एक विशेष बाब म्हणून सदर दुर्घटनेत रु. ३५,०००/- पेक्षा जास्त नुकसान झालेल्या बाधितांना प्रत्येकी रु. ३५,०००/- व ज्या कुटुंबाचे रु. ३५,०००/- पेक्षा कमी नुकसान झाले असेल त्यांना प्रत्यक्ष नुकसानीची रक्कम याप्रमाणे एकूण रक्कम रु. २३,४५,०००/- (रु. तेवीस लाख पंच्येचाळीस हजार फक्त) इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर केले असून, त्यानुसार तहसिलदार बोरीवली यांचेमार्फत एकूण ६७ बाधीत कुटुंबे / झोपडीधारक यांना अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे. तसेच सदर दुर्घटनेतील मयत मुलगा इयत्ता ७ वी मध्ये शिक्षण घेत होता. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक २१.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदानाची रक्कम सदर मयत विद्यार्थ्याच्या पालकांना मिळण्याकरिता तहसीलदार बोरीवली यांचेकडे दिनांक १९.०२.२०२३ रोजीचे पत्र व जिल्हा समितीसमोर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना शिक्षक निरीक्षक, मुंबई पश्चिम विभाग, जोगेश्वरी (पूर्व) यांना दिनांक २३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

*******





- गोराई गावातील गोराई गांव मुख्य रस्ता (उत्तन गाव ते मनोरी पर्यंत), गोराई जेट्टी रस्ता (जेट्टी ते गोराई क्रॉस चौक) व जामझाड पाडा रस्ता (गोराई मुख्य रस्ता ते जामझाडपाडा गांव) या खराब झालेल्या तीन रस्त्यांच्या सुधारणीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.
- गोराई गावामध्ये गोराई गाव दवाखाना सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत कार्यरत असून, या दवाखान्यामार्फत प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. तसेच, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राथमिक आरोग्य सक्षमीकरण योजनेंतर्गत सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत पॉलिक्लिनिक व

क्रमांक : ७९

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

## गुरुवार, दिनांक १३ जुलै, २०२३ / आषाढ २२, १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**७९.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग - २ व्दवारे दिनांक सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १८ निवेदने सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ व्दवारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. १८० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३५ निवेदने सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. त्यापैकी १४५ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३३ निवेदने सोमवार, दिनांक ०३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७४ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आले होते. आता एकूण ११२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १४ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : **१३ जुलै, २०२३**

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

\\MLS-DATASERVER\F Branch\१-०८ PC data\२०२२ THIRD SESSION\Calling attention\Lakshvedhi Nivedan Vitrit

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक ७९**

**ॲड आशिष शेलार, ॲड पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. सेल्वन, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, श्री. सुनिल प्रभू, श्री. संजय केळकर, श्री. बंटी भांगडिया, श्री. योगेश सागर, श्री. अतुल भातखळकर, श्री. मिहीर कोटेचा, श्री. पराग शाह, वि.स.स.** यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेले लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईतील मालाड मधील कुरार गाव परिसरात दि. १३.२.२०२३ रोजी वा त्या सुमारास सिलेंडरचा स्फोट होऊन झोपडपट्टीला आग लागणे, त्यामध्ये अनेक झोपड्या जळून खाक होणे, आगीत अग्निशमन दलाचे कर्मचारी व अनेक रहिवाशी जखमी झाल्याचे उघडकीस येणे, जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करणे, काही रुग्णांची परिस्थिती अत्यंत नाजूक असणे, त्यामुळे शासनाने जखमी व मृत झालेल्या नागरिक आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, शासनाने यावर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### -: मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-

मुंबईतील मालाड (पूर्व) जामऋषी नगर, वाघेश्वरी मंदिराजवळ, कुरार व्हिलेज या वन विभाग हद्दीतील अंदाजे ६० ते ७० झोपड्यांना दिनांक १३.०२.२०२३ रोजी सकाळी ११.११ वाजता आग लागल्याची वर्दी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास मिळाली होती. सदर आग अंदाजे १५० X २०० चौ. फुट परिसरातील विद्युत तारा, बांबू, ताडपत्री, घरगुती सामान, विद्युत यंत्र, काही नोटा, कागदपत्रे, दागिने, कपडे व फर्निचर, घरगुती एलपीजी गॅस सिलेंडर व शेगडी इत्यादींना लागली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत विद्युत पुरवठा खंडीत करुन आठ फायर इंजिनच्या दोन मोठ्या व चार बारीक पाण्याच्या लाईनचा वापर करुन सदर आग विझविण्यात आली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या तपासाअंती सदर आगीचे कारण "सदोष विद्युत प्रणाली" असे आढळून आले.

सदर दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे निर्देशनास आले, तसेच अग्निशमन दलाच्या एका अग्निशामकाच्या उजव्या पायाच्या तळव्याला किरकोळ दुखापत झाली होती. त्याला कांदिवली येथील शताब्दी मनपा रुग्णालयात डॉक्टरांनी उपचार करुन घरी सोडले.

सदर दुर्घटनेमधील बाधीत नागरिकांकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तातडीने नजीकच्या पारेखनगर येथील महानगरपालिका शाळेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात निवारा, जेवण इ. ची व्यवस्था करण्यात आली.

मानवतावादी दृष्टीकोनातून एक विशेष बाब म्हणून सदर दुर्घटनेत रु. ३५,०००/- पेक्षा जास्त नुकसान झालेल्या बाधितांना प्रत्येकी रु. ३५,०००/- व ज्या कुटुंबाचे रु. ३५,०००/- पेक्षा कमी नुकसान झाले असेल त्यांना प्रत्यक्ष नुकसानीची रक्कम याप्रमाणे एकूण रक्कम रु. २३,४५,०००/- (रु. तेवीस लाख पंच्येचाळीस हजार फक्त) इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर केले असून, त्यानुसार तहसिलदार बोरीवली यांचेमार्फत एकूण ६७ बाधीत कुटुंबे / झोपडीधारक यांना अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे. तसेच सदर दुर्घटनेतील मयत मुलगा इयत्ता ७ वी मध्ये शिक्षण घेत होता. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक २१.०६.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदानाची रक्कम सदर मयत विद्यार्थ्याच्या पालकांना मिळण्याकरिता तहसीलदार बोरीवली यांचेकडे दिनांक १९.०२.२०२३ रोजीचे पत्र व जिल्हा समितीसमोर प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना शिक्षक निरीक्षक, मुंबई पश्चिम विभाग, जोगेश्वरी (पूर्व) यांना दिनांक २३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

*******

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १७१२**

**श्री. सुनील राणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"बोरीवली (प.) येथील खाडीपलीकडील गोराई, उतन, मनोरी हे परिसर मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित असून तेथे पाणीपुरवठा, रुग्णालय, प्रसुतिगृह, पथदिवे आदि विविध नागरी सुविधांची मागील अनेक वर्षापासून अभाव असतानाही महापालिकेचे कायम दुर्लक्ष होत असल्याची भावना तेथील नागरिकांमध्ये निर्माण होणे, सदरहू नागरी सुविधांची विनाविलंब पूर्तता करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होणे, गोराई गावातील रस्त्यामध्ये काही भाग वगळता एकूण रस्त्याची स्थिती चांगली असतानाही या भागात कॉंक्रिटचे रस्ते बांधण्यासाठी जवळ १०० कोटीच्या निविदा मागविल्याने तेथील नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली असून आधी नागरी सुविधा अशी मागणी करण्यात येणे, गोराई कोळीवाडयातील नागरिकांना योग्य पाणी पुरवठा होत नसल्याचे पालिकेच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही दुर्लक्ष होत असल्याचे रहिवाशांना टॅंकर किंवा बोअरवेलचे पाणी वापरावे लागणे, विकास हा लोककेंद्रीत असावा गोराईत तो कंत्राटदार केंद्रित असल्यामुळे या प्रकरणी पालिका प्रशासनाची सखोल चौकशी करुन योग्य ती कारवाई विना विलंब करण्याची मागणीही करण्यात येणे, या संपूर्ण परिस्थितीबाबत गांभीर्याने विचार करुन सदरहू गोराई, उतन व मनोरी येथे विनाविलंब पाणी पुरवठा, रुग्णालय, प्रसुतिगृह रुग्णवाहिका, पथदिवे आदी नागरी सुविधांची पुर्तता करण्याचे दृष्टीने शासनाने ठोस करावायची कार्यवाही."

**-: मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन :-**

बोरीवली (प.) येथील खाडीपलीकडील गोराई व मनोरी परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे नागरी सुविधा पुरविण्यात येत आहेत:-

- सदर परिसरात स्थानिक नागरिकांच्या गरजेनुसार नागरी सुविधेंतर्गत पायवाट बनविण्याचे काम वेळोवेळी उपलब्ध निधीप्रमाणे करण्यात येते.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांवर पथदिवे बसविण्यात आले आहेत.
- सदर ठिकाणच्या गावांना लिबर्टी गार्डन टनेल-मालाड-मार्वे मार्गे पाणी पुरवठा केला जातो. त्याकरिता मार्वे जेट्टीहून खाडीतून जलवाहिनी टाकण्यात आली असून, खाडीपलीकडे मनोरी गावामार्गे टनेलपासून अंदाजे १२ कि.मी. अंतराहून सदर पाणी पुरवठा केला जात आहे.
- सदर अंतर जास्त असल्यामुळे एअर ट्रॅपच्या समस्येमुळे गोराई भागातील काही गावांस कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. याकरिता तेथील नागरिकांना दिलासा देण्याकरिता मागणीनुसार टॅंकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच, सदर पाणी पुरवठा सुधारण्यासाठी सातत्याने एअर ब्लो करणे व गळती थांबविणे यासारखी कामे करुन पाणी पुरवठा सुरळीत राखण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
- गोराई गांव येथील मार्केटजवळ शोषण टाकी व उदंचन केंद्र बांधून जलवाहिन्या टाकण्याची कामे प्रस्तावित केली आहेत. तथापि, सदर जागा कांदळवन क्षेत्रात येत असल्याने सदर जागेवर प्रस्तावित प्रकल्पास परवानगी मिळण्याकरिता मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. मा. न्यायालयाची मंजुरी मिळाल्यानंतर सदर काम तातडीने पूर्ण करण्यात येणार आहे.
- गोराई गाव येथील पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्याकरिता बोरीवली (प.) येथून गोराई खाडीमार्गे स्वतंत्र जलवाहिनी टाकून बोरीवली येथील महावीर जगर टनेलमधून पाणी पुरवठा करता येईल किंवा नाही याबाबतची शक्याशक्यता तपासण्यात येत आहे.

- गोराई गावातील गोराई गांव मुख्य रस्ता (उत्तन गाव ते मनोरी पर्यंत), गोराई जेट्टी रस्ता (जेट्टी ते गोराई क्रॉस चौक) व जामझाड पाडा रस्ता (गोराई मुख्य रस्ता ते जामझाडपाडा गांव) या खराब झालेल्या तीन रस्त्यांच्या सुधारणीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत.
- गोराई गावामध्ये गोराई गाव दवाखाना सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत कार्यरत असून, या दवाखान्यामार्फत प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. तसेच, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राथमिक आरोग्य सक्षमीकरण योजनेंतर्गत सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत पॉलिक्लिनिक व दुपारी ३ ते रात्री १० वाजेपर्यंत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना जनतेला प्राथमिक सुविधा पुरविण्यासाठी दुसऱ्या सत्रात सुरु करण्यात येणार आहे. गोराई गाव आरोग्य केंद्रामार्फत लसीकरण तसेच इतर आरोग्य विषयक सुविधा व सर्व शासकीय आरोग्य कार्यक्रमासंबंधी सुविधा पुरविल्या जातात.
- मनोरी गावामध्ये मनोरी दवाखान्यात सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत प्राथमिक सुविधा तसेच, दुपारी ३ ते रात्री १० या वेळेत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राथमिक आरोग्य सक्षमीकरण योजनेंतर्गत एच.बी.टी. क्लिनिकद्वारे प्राथमिक आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. मनोरी परिसरात लेहर आरोग्य केंद्रामार्फत लसीकरण, इतर आरोग्य विषयक सुविधा तसेच सर्व शासकीय आरोग्य कार्यक्रमासंबंधी सुविधा पुरविल्या जातात. त्याचप्रमाणे मढ विभागामध्ये रुग्णालयासाठी भूखंड आरक्षित असून, रुग्णालय प्रस्तावित आहे.
- विविध लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार गोराईतील मनोरी विभागातील रस्ते दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

उत्तन परिसरात मीरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे नागरी सुविधा पुरविण्यात येत आहेत:-

- उत्तन रस्ता (टप्पा-२) अंतर्गत मोर्वा-डोंगरी ते उत्तन या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे काम करण्यात येत असून, ३५% काम पूर्ण झाले आहे. उत्तन परिसरातील मुख्य रस्ते व पायवाटांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यात येऊन सदर रस्ते सुस्थितीत आहेत.
- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. अदानी लि., मे. टाटा पॉवर कंपनी व मे. एम.एस.ई.डी.सी.एल. यांचेमार्फत वीज पुरवठा करण्यात येत असून, उत्तन परिसरात विविध रस्त्यांवर मे. अदानी इलेक्ट्रिसिटी, मुंबई यांचेमार्फत एकूण १७४४ पथदिवे बसविण्यात आले असून, त्यांची नियमित देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असते.
- उत्तन परिसरातील गावांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येत असून, सदर ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत सुरु आहे. तसेच, ज्याठिकाणी जलवाहिनी टाकणे शक्य नाही त्या परिसरातील नागरिकांना विंधन विहीर व टँकरमार्फत पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
- उत्तन कार्यक्षेत्रात मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे १ नागरी आरोग्य केंद्र व २ उपकेंद्र (मुर्धा व मोर्वा) कार्यरत आहेत. सदर नागरी आरोग्य केंद्र व उपकेंद्रामार्फत महिला व नागरिकांसाठी भाईंदर येथे २०० खाटांचे पंडित भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय हे शासकीय रुग्णालय उपलब्ध आहे. सदर ठिकाणी प्रसुतीसेवा तसेच मेडिकल, सर्जिकल व निदानात्मक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत.
- उत्तन गावातील गरोदर माता व इतर रुग्णांना रुग्णालयात जाण्याकरिता महानगरपालिकेची तसेच, १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका उपलब्ध आहे.
- उत्तन कार्यक्षेत्रात चौक येथे १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्र मंजूर करण्यात आले असून, ते लवकरच सुरु करण्यात येत आहे.

*******

लक्षवेधी सुचना क्र. ८१५

# महाराष्ट्र विधानसभा
# सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**श्री. जयकुमार रावल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ८१५ पुढीलप्रमाणे आहे:-**

"उत्तर महाराष्ट्रातील धुळे, जळगांव आणि नंदूरबार हे तिन्ही जिल्हे विकासाच्या दृष्टीने पश्चिम महाराष्ट्रापेक्षा कितीतरी पटीने मागे असणे, तिन्ही जिल्हयात सिंचनाचा मोठा अनुषेष असणे, नाशिक महसुल मंडळ आणि खान्देशत महसुल मंडळ २ स्वतंत्र महसुल मंडळ करून नाशिक जिल्हयातील मालेगांव जिल्हा निर्मितीचा प्रश्न मार्गी त्या हिंदू हदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची घोष्णा प्रत्यक्षात साकार करण्याची निर्माण झालेली गरज, नविन मालेगांव तालुक्यात मनमाड, नांदगाव, नामपूर, तर धुळे जिल्हयातील दोंडाईचा पिंपळनेर असे विविध तालुक्यांच्या निर्मितीचा विषयही अनेक वर्षापासुन प्रलंबित असणे, यासाठी नाशिक महसुल मंडळाचे विभाजन करून अमरावती महसुल मंडळाच्या धर्तीवर खान्देशातील धुळे, नंदूरबार आणि जळगांव जिल्हयाचे स्वतंत्र महसुल मंडळ करण्याची मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये केलेली घोषणा, त्यामुळे जनतेच्या मनात नविन आशा पल्लवित होणे, यासाठी तिन्ही जिल्हयाचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या धुळे जिल्हयात महसुल मंडळाचे मुख्यालय करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

नाशिक महसुली विभागात नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव व अहमदनगर या पाच जिल्हयांचा समावेश होतो. यापैकी धुळे, नंदूरबार व जळगाव या जिल्हयांचा समावेश उत्तर महाराष्ट्र या प्रादेशिक विभागात होतो. राज्यात मानव विकास कार्यक्रम २३ जिल्ह्यांतील निवडक १२५ तालुक्यांत राबविण्यात येतो. मागासलेल्या तालुक्यांच्या निवडीसाठी सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण व सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुबांचे प्रमाण हे दोन निकष विचारात घेण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे निवडलेल्या अतिमागास १२५ तालुक्यांमध्ये धुळे जिल्हयातील ०४ तालुके, नंदूरबार जिल्ह्यातील ०६ तालुके व जळगाव जिल्ह्यातील ०७ तालुके यांचा समावेश आहे. सिंचन अनुशेषाची परिगणना करण्यासाठी नियुक्त केलेल्या निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालानुसार धुळे, जळगाव व नंदुरबार या जिल्ह्यांत सिंचनाचा अनुशेष नाही. धुळे, जळगाव व नंदुरबार या तीन जिल्हयांसाठी स्वतंत्र विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करुन त्याचे मुख्यालय जळगाव येथे करण्याबाबत मा. मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण) यांचे निवेदन विभागास प्राप्त झाले असून त्यानुसार विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना अहवाल सादर करण्याबाबत विभागाच्या दिनांक २५.०१.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

राज्यातील जिल्ह्यांच्या निर्मिती/ पुनर्रचनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास

प्राप्त झाला आहे. समितीने केलेल्या जिल्हा निर्मिती / पुनर्रचनाबाबतच्या शिफारशींवर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठीची प्रक्रिया सुरू आहे.

राज्यातील तालुका विभाजन / पुनर्रचना करण्याकरिता निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने आपला अहवाल दि.०६.०३.२०१३ रोजी सादर केला होता. तथापि, महसूल विभागांतर्गत बऱ्याच सेवांचे संगणकीकरण झालेले असल्यामुळे या बदलाच्या पार्श्वभूमीवर समितीने केलेल्या शिफारशी, निकष, गुणांक आजच्या परिस्थितीत लागू पडतीलच, असे म्हणता येणार नाही. सबब  महसूल विभागातील विविध सेवांचे झालेले संगणकीकरण, माहिती तंत्रज्ञानात झालेला बदल, या बाबी विचारात घेता, राज्यातील तालुक्यांच्या विभाजनांच्या अनुषंगाने नव्याने निकष ठरविण्यासाठी महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि. ०२.०३.२०२३ अन्वये तालुका पुनर्रचना समिती स्थापन करण्यात आली आहे.

नवीन जिल्हा / तालुका निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून खर्चिक बाब आहे. त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा / तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे. असे असले तरी धुळे जिल्हयातील दोंडाईचा, पिंपळनेर व धुळे शहरासाठी स्वतंत्र अपर तहसिलदार कार्यालये मंजूर करण्यात आली आहेत. तसेच विभागाच्या दिनांक १९.१२.२०२२ च्या पत्रान्वये राज्यातील सर्व विभागीय आयुक्तांना त्यांच्या विभागाच्या नियंत्रणाखालील महानगरपालिका क्षेत्रामध्ये वाढलेली लोकसंख्या, तालुक्यातील दुरच्या भागातील जनतेस तातडीने व नजिकच्या ठिकाणी सेवा उपलब्ध व्हाव्यात तसेच सद्याच्या तहसिल कार्यालयातील कामकाजाचा वाढता व्याप या सर्व बाबींचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार स्वतंत्र अपर तहसिल कार्यालय निर्माण करण्याबाबत आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत सखोल तपासणी करुन स्वयंस्पष्ट व परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले असून, त्यानुसार पाठपुरावा करण्यात येत आहे.

**************

लक्षवेधी सूचना क्र. ८१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**ॲड. आशिष शेलार, ॲड. पराग अळवणी, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. सेल्वन, श्री. किसन कथोरे, श्री. प्रशांत ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबईतील मंत्रालयातून चालणा-या बनावट भरतीचे धक्कादायक रॅकेट फेब्रुवरी २०२३ च्या तिस-या आठवड्यात उघडकीस येणे, माजी सामाजिक न्याय मंत्री यांच्या नावाचा वापर करून नियुक्ती आदेशाचे बनावट पत्र देऊन मंत्रालयातील कर्मचारी, लिपिक भरतीचे रॅकेट चालवित असल्याचे निदर्शनास येणे, बोगस भरती लिपिक रॅकेट प्रकरणी गोवंडी पोलिसांनी एका मंत्रालयीन कर्मचा- यासह तिघांविरुद्ध गुन्हा नोंद करून अटक करण्यात येणे, अद्यापही काही गुन्हेगार फरारी असून त्यांचा शोध सुरू असणे, या प्रकरणी शासनाने अजून कोणकोणत्या अधिका-यांचा समावेश आहे याची दखल घेणे गरजेचे असणे, त्यामुळे शासनाने तातडीने कार्यवाही करून संबंधीत भ्रष्ट असणा-या अधिकारी-कर्मचा-यांवर करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

माहे ऑक्टोबर, २०२० च्या दरम्यान आरोपींनी फिर्यादीच्या मुलाला मंत्रालयात सामाजिक न्याय विभागामध्ये क्लार्क पदावरील नियुक्तीचे बनावट नोकरी आदेश देऊन त्याबदल्यात फिर्यादीकडुन रुपये ७,३०,०००/- स्वीकारले होते. याबाबत फिर्यादीस आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलीसात तक्रार करतो. असे आरोपीला सांगितले असता स्विकारलेल्या एकूण रक्कमेपैकी रू.२,००,०००/- आरोपीने फिर्यादीस परत केले. तथापि उर्वरीत रक्कम न दिल्याने फिर्यादीने दिलेल्या फसवणूकीच्या तक्रारीवरून आरोपींविरोधात गोवंडी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.६९/२३ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यातील सर्व पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपींमध्ये दोन आरोपी हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त असलेल्या बार्टी, पुणे या संस्थेमार्फत बाह्यस्त्रोताव्दारे नियुक्त कर्मचारी होते व त्यांच्या सेवा लिपिक-टंकलेखक व शिपाई म्हणून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य या मंत्रालयीन विभागास उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या दोघांच्या सेवा यापूर्वीच परत करण्यात आलेल्या असून अटक आरोपींमध्ये या दोघांचा समावेश आहे.

सदर अटक आरोपीकडून गुन्ह्यातील बनावट नियुक्ती आदेश व ईमेल आयडी बनविण्यासाठी वापरण्यात आलेला लॅपटॉप तसेच पैशाच्या व्यवहाराचे बॅंक स्टेटमेंट ताब्यात घेण्यात आले असून गुन्ह्यात जप्त केलेल्या लॅपटॉप मधील हार्ड डिस्क ही तांत्रिक विश्लेषणासाठी संचालक रासायनिक विश्लेषण प्रयोगशाळा कलीना, सांताक्रुज येथे पाठविण्यात आली आहे.

सदर गुन्ह्यात मा. न्यायालयामध्ये दोषारोपपत्र सादर केले असून, फौ.दं.प्र.सं. कलम १७३ (८) अन्वये तपासाची कागदपत्रे मा. न्यायालयात सादर करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

-------------------

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक-२२६९</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**<u>सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन</u>**

**श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक-२२६९**

"मौजे भरोडी गांव, ता.भिवंडी, जि. ठाणे येथील हायस्पीड रेल्वे बुलेट ट्रेन कार्पोरेशन भूसंपादित जमिनीसाठी सर्व्हे क्र.२१५/1 व इतर जमिन मिळकतीत १२ कोटी रुपयांचा भुसंपादन मोबदला हा परस्पर बोगस व भामट्या शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खातेत वळवल्याचे तक्रार दर्शना हरीदास मढवी यांनी विभागीय कोकण आयुक्त व पोलिस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक खाते, ठाणे यांना दि. १५/१२/२०२२ रोजी तक्रार दिली असणे, तक्रार देऊन आज कित्येक दिवस उलटूनही बनावट शेतकऱ्यांवरती गुन्हा दाखल करून त्यांच्याकडून एकही पैशाची वसूली करण्यात आलेली नसणे, संबंधीत बनावट शेतकऱ्यांनी दर्शना हरीदास मढवी यांना मानसिक छळ देण्याचा व जिवे ठार मारण्याची धमकी दिली असणे, यांच्या जमिनीचे भरोडी दस्तक्रं. १४९६/२०२० मध्ये दि. ३० मार्च २०१२ या जमिनीच्या २२ खातेदारांपैकी फक्त ४ खातेदारांचे बनावट साठेकरार देऊन परस्पर बनावट खातेदारांनी स्वतःच्या बँकेत पैसे वळवून एक बनावट प्रतिज्ञापत्र सुध्दा बनविण्यात येणे, यामधील कुठलाही प्रतिज्ञापत्र व साठेकरार हे नोटरी समक्ष नोटरी झालेले नसुन नोटरी बुकात अंगठा-सही नसतांना परस्पर हे बनावट करार बनवण्यात आलेले असणे, तसेच १५ दिवसांसाठी तात्पुरते स्वरुपात रोहन पवार या तलाठीला आणुन वडिलोपार्जित वारसाने दर्शना हरिदास मढवी व त्यांच्या कुटूंबदारांचे नावे डावलुन ४ खातेदारांचे फेरफार नोंदवण्यात आले आणि त्या चौघांनी ८ करोड़ रुपये त्यांच्या बँक खात्यात वळवले, हे सर्व लाचलुचपत प्रतिबंधक खाते ठाणे व कोकण विभागीय आयुक्त यांना माहित असुनही त्यांनी गुन्हा दाखल करण्याचे धाडस अजुनपर्यंत केलेले नसणे, कारण लुटारू व बनावट शेतकऱ्यांचे मोठे वशीले असल्याने यांच्यावरती अद्यापर्यंत गुन्हा दाखल करण्याची कारवाई झाली नसणे, तक्रारदार दर्शना हरिदास मढवी व त्यांचे कुटूंबदार यांची जमिनही गेली व पैसेही भामट्याने चोरून नेल्यामुळे ते देशोधडीला लागलेले असणे, त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली असणे, त्यामुळे शासनाने अतिगांभिर्याने या प्रकरणात लक्ष घालून संबंधीत बनावट शेतकऱ्यांवरती अतितातडीने गुन्हा दाखल करण्याची व भूसंपादन मोबदल्याची रक्कम वसूलीची कारवाई होण्यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कारवाई प्रतिक्रिया व भूमिका."

रोहयो/लक्ष - ०३१७ - १(८००-६-२३)

## मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

मौजे भरोडी गांव, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील हायस्पीड रेल्वे बुलेट ट्रेन कार्पोरेशन भूसंपादित जमिनीसाठी सर्व्हे क्र.२१५/१ व इतर जमीन मिळकतीत १२ कोटी रूपयांचा भुसंपादन मोबदला हा परस्पर बोगस व भामट्या शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यात वळवल्याबाबतची तक्रार श्रीमती दर्शना हरीदास मढवी यांनी पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांना दिनांक १५/१२/२०२२ रोजी केली होती. अर्जदार श्रीमती दर्शना हरीदास मढवी यांनी केलेल्या तक्रारी अर्जातील आक्षेप मा. विभागीय आयुक्त, कोंकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यक्षेत्रातील असुन आक्षेपांची त्यांचे अधिपत्याखालील संबंधीत विभागाकडून चौकशीअंती आक्षेपात भ्रष्टाचाराचे संबंधात मुद्दा उपस्थित होत असल्यास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (संशोधन २०१८) चे कलम १७ (अ) मध्ये नमुद प्रमाणे चौकशी/तपास करण्याकरीता विहीत कालमर्यादित लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राधिकृत करणेसाठी अर्जदार यांचा तक्रार अर्ज विभागीय आयुक्त, कोंकण भवन, नवी मुंबई यांना वर्ग होणेकरीता पोलीस अधीक्षक, लाप्रवि, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांच्या कार्यालयाकडील दि.१७/०३/२०२३ रोजी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अहवाल सादर करण्यात आलेला असून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

या प्रकरणी तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी निर्गमित केलेल्या प्रपत्रास अनुसरुन प्रकल्प संस्था, मुख्य प्रकल्प अधिकारी, नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लि. मुंबई यांनी सह दुय्यम निबंधक, भिवंडी-१ यांचे नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्रमांक १४२६/२०२० दिनांक १८/०२/२०२० रोजी निष्पादीत केले असून संपादीत जमिनीचा मोबदला खातेदार यांना नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लि. मुंबई यांच्या कार्यालयामार्फत अदा करण्यात आलेला आहे.

तसेच फेरफार क्रमांक ९५० दिनांक ०१/०१/२०२० अन्वये मा. दिवाणी न्यायालय, भिवंडी (क स्तर) यांचेकडील रे.मु.नं.६४०/२०१९ मधील दिनांक २०/१२/२०१९ रोजीच्या आदेशानुसार मयत तुळशीबाई गोविंद भगत यांचे वारस म्हणून एकुण २२ खातेदारांचे नावे ७/१२ सदरी दाखल केलेले आहेत.

जमीन मालक श्रीमती चिंधुबाई पाख-या भगत व इतर २१ यांनी श्री.हर्षल प्रमोद पाटील व श्री.वरूण सदाशिव पाटील यांना नोटराईज्ड सत्यप्रतिज्ञापत्र दिनांक २९/०१/२०२० रोजी लिहून दिले असून त्यान्वये संपादीत जमिनीच्या मोबदल्यापोटी मिळणा-या एकूण रक्कमेपैकी ४५% रक्कम जमीन मालक चिंधुबाई पाख-या भगत व इतर २१ यांना व ५५% रक्कम जमीन साठेकरार लिहून घेणार १. श्री.हर्षल प्रमोद पाटील २.श्री.वरूण सदाशिव पाटील यांना देण्यास संमती दिलेली आहे. त्यानुसार साठेकरार लिहून घेणार यांना खरेदीखत नोंदणी करताना मान्यता देणार म्हणून सहभागी करण्यात यावे व सत्यप्रतिज्ञापत्रात नमूद केल्याप्रमाणे ४५% मोबदल्याची रक्कम जमीन मालक व ५५% मोबदल्याची रक्कम जमिन साठेकरार लिहून घेणा-यांना अदा करण्यात यावी, असे तत्कालीन उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांनी दिलेल्या प्रपत्रांमध्ये नमुद केल्याचे दिसून येते. त्यानुसार, नॅशनल हायस्पीड रेल कार्पोरेशन.प्रा.लि. मुंबई यांनी त्यानुसार नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्रमांक १४९६/२०२० दिनांक १८/०२/२०२० निष्पादीत करून मोबदला वाटपाची कार्यवाही केली असल्याचे दिसून येते.

एच - ०३६१ - १ अ

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार श्रीमती दर्शना हरिदास मढवी यांचे वडील पंडित विष्णू भगत यांनी इतर २१ खातेदारांसमेवत श्री.हर्षल पाटील व श्री.वरूण पाटील यांचे नावे नोटराईज्ड संमतीपत्र दिनांक २९/०१/२०२० रोजी लिहून दिलेले आहे. त्याअनुसार जमीन मालकांना ४५% मोबदला रक्कम वाटप करण्यात आली असून त्यापैकी रु.६८,५९,२५६/- इतकी रक्कम श्री.पंडीत विष्णू भगत यांना त्यांच्या वारस हिश्श्यानुसार अदा करण्यात आली असल्याचे दिसून येते.सबब, तक्रारदार यांचे वडील श्री.पंडीत विष्णू भगत यांनी त्यांच्या हयातीत दुय्यम निबंधक कार्यालयात स्वतः उपस्थित राहून सदर मिळकतीचे नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लि. या प्रकल्प संस्थेबरोबर नोंदणीकृत खरेदी दस्त क्र.१४९६ दिनांक १८.०२.२०२० रोजी दस्तावर स्वाक्षरी केलेली आहे. त्यामुळे, तक्रारदार यांच्या वडीलांना डावलून मोबदला रक्कम वाटप करण्यात आली असे म्हणणे वस्तुस्थितीस धरुन नाही, असे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांनी कळविले आहे.

श्री. बुधाजी हिंदोळा, तलाठी सजा , अंजूर यांची बदली झाल्याने श्री.रोहन राजेंद्र पवार, तलाठी, सजा-खालिंग यांचेकडे तलाठी सजा, अंजुरचा अतिरिक्त कार्यभार दि.२०/०५/२०२० ते २१/०९/२०२० पर्यंत सोपविण्यात आला होता. तत्कालीन तलाठी श्री. रोहन राजेंद्र पवार यांनी फेरफार क्रमांक ११७०, दिनांक ११/१०/२०२१ द्वारे सर्व्हे नंबर २००/१/ब, २११, २१२/६, २१३, २९४, २१५/१, २२१, ४३/४, ५/५ या जमीन मिळकतीतील श्री.पंडीत विष्णू भगत हे दिनांक २५/०६/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांना वारस म्हणून त्यांची मुलगी श्रीमती दर्शना हरिदास मढवी यांच्यासह इतर तीन वारसदारांची नावे वारसनोंद म्हणून दाखल करण्यात आली आहे. सदर फेरफार दिनांक २३/१२/२०२१ रोजी मंजूर करण्यात आलेला आहे. सबब, सदर वारस नोंदणीकरीता १५ दिवसांसाठी तलाठी यांची तात्पुरती नियुक्ती केली होती हे म्हणणे खरे नाही, असे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांनी कळविले आहे.

या प्रकरणी, भूंपादन संदर्भात प्राप्त झालेल्या विविध तक्रारींच्या अनुषंगाने महसूल व वन विभाग यांच्या दिनांक २३/२/२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आलेली असून समितीमार्फत सदर प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांनी कळविले आहे.

************************************************************************************************

लक्षवेधी सूचना क्र. १४२३

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

मा. श्री.भास्कर जाधव, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १४२३ खालीलप्रमाणे आहे.:-

"कोकणातील, विशेषतः रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बेदखल कुळांच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरिता श्री. राधेशाम मोपलवार, तत्कालिन विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने प्रत्येक तालुक्याचा दौरा करून दि. १९ जानेवारी २०१७ रोजी शासनाला अहवाल सादर केलेला असणे, सदर अहवालात मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८च्या विविध कलमांत सुधारणा करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले असणे, याशिवाय पीकपाहणीच्या नोंदी अदययावत करणे, कुळ कायदयांच्या प्रकरणातील दावे चालविणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे, सर्व प्रलंबित दावे एका वर्षात निकाली काढण्यासाठी अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करणे, कातकऱ्यांच्या घरठाणांबाबत यापूर्वी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींप्रमाणे बेदखल कुळांच्या घरठाणांच्या जागांबाबत शिफारस अशा अनेक शिफारशी करण्यात आलेल्या असणे, तथापि अद्याप सदर अहवाल शासनाने स्विकारलेला नसणे, त्याआधीपासून पेजे समितीचा अहवालदेखील शासनस्तराव प्रलंबित असणे, कोकणातील लाखांहून अधिक बेदखल कुळांचा प्रश्न गेल्या ६०-६५ वर्षापासून प्रलंबित असणे, कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या ७० ब कलमामध्ये वेळोवेळी बदल करूनही कुळांचे प्रश्न कायम असणे, रत्नागिरी जिल्ह्यातील तिलोरी कुणबी समाजाला देण्यात येणारे तिलोरी कुणबी-८३ ओबीसी दाखले हे अचानक बंद केल्याचे मुकतेच दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी समोर येणे, परिणामी कुणबी समाजातील विद्यार्थांना शाळा-महाविद्यालयात किंवा अन्य ठिकाणी प्रवेशासाठी ओबीसी दाखले मिळणार नसल्याने या समाजामध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, मोपलवार आणि पेजे या दोन्ही समितींचा अहवाल स्विकारून कुणबी समाजाला विकासा प्रवाहात आणण्याची गरज, ही बाब लक्षात घेवून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री (महसूल) यांचे निवेदन

कोकणातील बेदखल कुळाच्या समस्यांच्या सर्वकष अभ्यासाकरीता नेमलेल्या विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शासनास अहवाल सादर केलेला असून, या अहवालातील कातकऱ्यांच्या घरठाणांबाबत आणि बेदखल कुळांच्या धोरणाबाबत अधिकार अभिलेखात (७/१२ सदरी) योग्य त्या नोंदी घेण्याच्या शिफारशीच्या अनुषंगाने कातकऱ्यांसह शेतमजूर आणि कारागिरांच्या घरठाणांबाबत अधिकार अभिलेखात नोंद घेण्यासाठी शासन अधिसूचना दि.२७/०४/२०१८ अन्वये महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन नियम, १९५६ मध्ये नियम ११ अ अशी सुधारित तरतूद करण्यात आली आहे. तसेच या नियमांमुळे नोंदविलेले अभिलेखातील नोंदी संदर्भातील शेतमजूर आणि कारागिराच्या वस्त्यांची ठिकाणे व घरे आणि घराखालील जमिनीच्याबाबत दि. ३१ मे २०२२ ही तारीख कट ऑफ डेट म्हणून शासन अधिसूचना दि.०१ एप्रिल २०२२ अन्वये निर्धारीत केली आहे. या तरतुदीमुळे कातकऱ्यांसह शेतमजूर आणि कारागिरांच्या घरठाणांचे अधिकार अभिलेख अद्ययावत होण्यास मदत होईल.

(कृ.मा.प.)

ई-पीक पाहणी नोंदी अद्ययावत करण्याची सुविधा मोबाईल ॲपद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.

बेदखल कुळाबाबतच्या शासन निर्णयानुसार ज्या खातेदारांची बेदखल कुळ म्हणून अभिलेखात नोंद झालेली आहे. त्यापैकी ज्या खातेदारांनी कुळवहिवाट सिध्द करण्यासाठी मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ७० व कलम ४ (२) (सुधारणा) नुसार दावे दाखल केलेले आहेत, अशा दाव्यांमध्ये सुनावणी घेऊन प्रकरणे निकाली करण्याची कार्यवाही सुरू आहे.

रत्नागिरी जिल्हयातील सर्व तालुक्यांमध्ये तिलोरी कुणबी समाजातील व्यक्तींकडून ओबीसी प्रवर्गाचे जातीच्या दाखल्यासाठी प्राप्त होणारी प्रकरणे सर्व उपविभागीय अधिकारी यांचेकडून स्विकारण्याची कार्यवाही सुरु असून कुणबी-८३ जातीचे दाखले देण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर दाखले देण्याची कार्यवाही सुरु असल्यामुळे रत्नागिरी जिल्हयातील तिलोरी कुणबी समाजातील विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. निवडणुकीच्या वेळी उमेदवार असलेल्या तिल्लोरी कुणबी समाजाच्या व्यक्तीकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कुणबी-८३ जातीचे दाखले उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

सदर तिल्लोरी कुणबी समाजाच्या कुणबी जातीच्या दाखल्याबाबत समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक सीबीसी १०९६/प्र.क्र.४८/मावक-५, दि. ०३.०६.१९९६ परिशिष्ट अ मधील मुद्दा क्र. २५ नुसार तसेच स्थानिक चौकशी करून रत्नागिरी जिल्ह्यामध्ये कुणबी जातीचे दाखले देणेची कार्यवाही सुरु आहे.

तिल्लोरी कुणबी समाजाच्या संघटनेने राज्य मागासवर्ग आयोगाकडे इतर मागास वर्गाच्या यादीत समावेश होण्याबाबत लेखी विनंती केली आहे. या मागणीनुसार दि.२३.०१.२०२३ रोजी रत्नागिरी येथे व दि.१०.०३.२०२३ रोजी पुणे येथे राज्य मागासवर्ग आयोगाने समाज संघटनेसोबत सुनावणी घेतली. आयोगाने संघटनेस पुरावे व कागदपत्रे सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत दिली आहे. राज्य मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनंतर शासन याबाबत योग्य तो निर्णय घेऊ शकेल.

वरील वस्तुस्थितीचा विचार करता सद्यस्थितीत ज्यांच्याकडे मानीव दिनांकापूर्वीच्या इतर मागासवर्ग क्र.८३ वर नमूद जातीच्या नोंदी आहेत, त्यांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

-------------------

लक्षवेधी सूचना क्रमांक :- २०१९

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री. जयंत पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २०१९ पुढीलप्रमाणे आहे :-

"गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा वनविभाग अंतर्गत कमलापुर वनपरिक्षेत्रातील शासकीय हत्ती कॅम्प येथे ८ हत्ती यात २ नर व ६ मादांचा समावेश असणे, त्यामध्ये मंगला नामक ३२ वर्षीय हत्तीण हिची गर्भधारणा झाली असणे, जानेवारी २०२३ फेब्रुवारी २०२३ दरम्यान प्रसुती होईल असा अंदाज असणे, गर्भधारणा झालेल्या हत्तीणीची देखभाल करण्याकरीता कायमस्वरुपी पशुवैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याची वन्यजीव प्रेमी करुन सतत मागणी करण्यात येणे, परंतू उपवनसरंक्षक सिरोंचा वनविभाग यांनी या मागणीकडे दुर्लक्ष केल्याची गंभीर बाब समोर येणे, परिणामी दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी जंगलात प्रसुती होणे, जंगलात प्रसुती झाल्याचे लक्षात येताच मंगला हत्तीणीला आणण्याकरीता जंगलात कर्मचारी गेले असता नवजात पिल्लु मृतावस्थेत आढळणे, सिरोंचा वनविभागातील कमलापूर शासकीय हत्तीकॅम्प राज्यातच नव्हे तर देशात प्रसिध्द असल्यामुळे या ठिकाणी नेहमी पर्यटकांची वर्दळ असणे मात्र दुर्लक्षामुळे येथे दरवर्षी हत्तीचा मृत्यू होत असल्याची बाब समोर येणे, यापुर्वी मंगलाच्या आदित्य, सई, अर्जुन नावाच्या तीन पिलांचा मृत्यू झालेला असणे, त्यामुळे वनविभागाच्या कार्यप्रणालीवर पर्यटकांनी तिव्र नाराजी व्यक्त करणे, या घटनेमुळे राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण, समाजीक कार्यकर्त्याकडून हत्तीच्या मृत्यूबाबत न्यायलयात याचिका दाखल करुन न्यायलयीन चौकशी करण्याची होत असलेली मागणी, परिणामी या ठिकाणचे सौदर्य जाण्याकरीता हत्तीच्या देखरेखीसाठी आवश्यक सोई सुविधा पुरविण्याची नितांत गरज, गर्भात वाढलेले बाळ जन्मताच दगावण्याची असंवेदनशील घटना, याबाबत जनसंघर्ष समितीने नियमीत चिकित्सक, चाराकटर, व महावत यांची नियुक्ती करण्याची केलेली मागणी या घटनेस जबाबदार सबंधीत सिरोंचा वनपरिक्षेत्राचे उपवन सरंक्षक, मुख्य वन सरंक्षक यांना निलंबीत करण्याची स्थानिकाकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया"

---

**मा. मंत्री (वने)** **श्री. सुधीर मुनगंटीवार**

## निवेदन

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा वन विभागात कमलापूर वन परीक्षेत्रात शासकीय हत्ती कॅम्प स्थित आहे. सदर हत्ती कॅम्प सन १९६२ पासून अस्तित्वात आहे. पूर्वी वन विभागमार्फत काष्ट वनउपज निषकासनाच्या कामाकरिता हत्तींची मदत घेण्यात येत होती. तथापि सदर कामे यांत्रिकी सहाय्याने सुरू झाल्यामुळे आता विभागामार्फत या हत्तींचे कमलापूर येथे संगोपन करण्यात येत आहे. कमलापूर हत्ती कॅम्प हा निसर्गरम्य ठिकाणी स्थित असल्याने सदर कॅम्प पर्यटकांमध्ये आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.

सद्यस्थितीत कमलापुर हत्ती कॅम्प मध्ये २ नर व ६ मादी असे एकूण ८ हत्तींचे वास्तव्य आहे. सदर हत्ती बंदिस्त नसून बहुतांश वेळी जंगलामध्ये चराई करतात व केवळ खाद्य देण्यासाठी महावत व चाराकटर यांचे मार्फत कॅम्प मध्ये आणले जातात. याचवेळी पर्यटक हत्ती कॅम्पला भेट देतात व त्यांना हत्ती पाहण्याचा आनंद घेता येतो. मात्र सदर क्षेत्र नक्षलग्रस्त असून सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील आहे. त्यामुळे तेथे सोयी सुविधा तयार करण्यास अडचणी निर्माण होत आहे.

हत्ती कॅम्प मधील हत्ती हे बंदिस्त नसुन त्यांना केवळ दुपारच्या वेळी जंगलातून कॅम्प मध्ये आणले जाते. प्रसुतीचे वेळी हत्तीण स्वता:ला समूहातून एकटी करून घेत असते व नैसर्गिकरीत्या प्रसूती होत असते. या पूर्वी सर्व प्रसूती अशाच पद्धतीने झालेल्या आहेत. त्यामुळे अशा वेळी हत्तीणी जवळ कर्मचारी/वैद्यकीय अधिकारी उपस्थित असण्याची संभावना नाही.

शेठा / एच · ०४५५ (८०० -७-२३)

(कृ. मा. प.

कमलापूर हत्ती कॅम्प मधील मंगला नामक मादीस गर्भधारणा होऊन माहे जानेवारी/फेब्रुवारी, २०२३ दरम्यान प्रसूती होईल असा अंदाज होता. या करीता स्थानिक पशु वैद्यकीय अधिकारी सदर कॅम्पला भेट देऊन तेथील कर्मचाऱ्यांमर्फत हत्तीणीवर लक्ष ठेऊन होते. तथापि, दिनांक २७.०२.२०२३ रोजी सकाळी महावत हत्तींना आणायला जंगलात गेले असता रात्रीच्या वेळी वन खंड क्र १२६ च्या नाल्यामध्ये हत्तीणीने पिल्लाला जन्म दिल्याचे निदर्शनास आले. परंतु सदर पिल्लू मृत अवस्थेत असल्याचे आढळून आले.

सदर घटनेची दखल घेऊन मृत पिल्लाचे शव विच्छेदन ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे पशुवैद्यकीय अधिकारी व मुलचेरा येथील पशुधन विकास अधिकारी यांचे मार्फत करण्यात आले. सदर हत्तीचा मृत्यु Elephant Endotheliotropic Herpes Virus (EEHV) मुळे झाल्याचे प्राथमिक अहवालावरून दिसून येत आहे. सद्यस्थितीत मंगल हत्तीणीची प्रकृती सुस्थितीत असून तिच्या प्रकृतीची आवश्यकती काळजी घेण्यात येत आहे.

यापूर्वी माहे ऑगस्ट २०२१ मध्ये सई व अर्जुन या हत्तींचा मृत्यू EEHV मुळे झाल्याचे निदर्शनास झाले होते. तसेच माहे जून २०२० मध्ये आदित्य नामक पिलु चिखलात फसल्याने किडनीवर आलेल्या ताणामुळे सदर हत्तीचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले होते.

सद्यस्थितीत हत्ती कॅम्प येथे ५ महावत व ४ चाराकटर असे ९ स्थायी कर्मचारी कार्यरत आहेत. त्याशिवाय कमलापुर गावातील १० वन मजूर देखील हत्तींच्या देखरेखीसाठी कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांना हत्ती हाताळण्याचा दीर्घ अनुभव आहे. त्याचबरोबर वनरक्षक व वनपाल तथा वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेमार्फत सदर हत्ती कॅम्पचे व्यवस्थापन करण्यात येते. तसेच हत्तीचे व्यवस्थापन अद्ययावत करण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकारी यांचा समवेश करून समिती गठित करण्यात आली आहे.

कमलापूर हत्ती कॅम्प मधील हत्तींना वैद्यकिय सोवा पुरविण्यासाठी व तपासणीकरीता दर १५ दिवसांनी ताडोबा येथील पशु वैद्यकीय अधिकारी, पशुधन विकास अधिकारी अहेरी आणि जीमालगट्टा यांची देखील मदत घेण्यात येते. तसेच Wildlife Research and Training Center, गोरेवाडा येथील पशु वैद्यकीय चमू मार्फत माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये सर्व हतींची विशेष वैद्यकीय तपासणी देखील करण्यात आली आहे.

माहे डिसेंबर २०१९ मध्ये हत्ती कॅम्प येथे येणाऱ्या पर्यटकांच्या सोयीसाठी येथे सुविधा निर्माण करण्यात आल्या होत्या व सौंदर्यीकरण करण्यात आले होते. परंतु सदर सुविधांचे नक्षलवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान करण्यात आले होते. तथापि, पर्यटकांकडून कोणतेही शुल्क न आकारता सुरक्षेच्या दृष्टीने स्थानिक पातळीवर पर्यटकांना सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येतो जेणेकरून पर्यटकांना हत्तींचे पाहण्याचा आनंद घेत येऊ शकेल.

*******

लक्षवेधी सूचना क्र.१०३४

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे प्रथम अधिवेशन

मा. श्री. सुनिल प्रभु, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १०३४ खालीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील शासकीय तसेच अनुदानीत आश्रम शाळांमधील ११२६ बालकांना प्राण गमवावा लागल्याचे धक्कादायक वास्तव दि.२३.१.२०२३ रोजीच्या सुमारास निदर्शनास येणे, यापैकी तलासरी, डहाणू, पालघर या भागात आरोग्याच्या कारणांमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची बाब उघड होणे, उधवा येथे राहणाऱ्या कु.मिताली चौधरी या १२ वर्षाचा मुलीचा ५.१०.२०२२ रोजी तिच्या राहत्या घरापासून १५ मिनिटाच्या अंतरावर असलेल्या आश्रम शाळेत मृत्यु झाल्याची घटना घडणे, अचानक ताप आल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले असता, प्रकृती गंभीर नसलयाचे सांगून परत पाठविण्यात येणे, तब्येत अधिकच खालावल्याने दादरा-नगर-हवेली येथील खानवेल प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले असते मुलीचा मृत्यु होणे, यावरून ग्रामीण आदिवासी भागात बालरोग व स्त्रीरोग तज्ञ अभावी मोठ्या प्रमाणात बालकांचे व मातांचे उपचाराअभावी मृत्यु होत असल्याच्या घटना मध्ये वाढ होत असल्याने सदरहू बाब ही चिंताचनक असणे. आश्रम शाळांमधील व्यथा आणि आरोग्याकडे शासनातर्फे वेळीच योग्य दखल न घेतल्यामुळे अथवा त्यांच्याकडे लक्ष न दिल्यामुळे ५ वर्षात ११२६ बालकांचा मृत्यु झाल्याची गंभीर घटना घडणे, म्हणून राज्य शासनाने आश्रम शाळेतील बालकांचे वाढते मृत्यु रोखण्याकरिता ठोस उपाययोजना करणयाच्या दृष्टीने तातडीने कार्यावाही करण्याची आवश्यता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, येथील आदिवास जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

डॉ. विजयकुमार गावित, मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन

आदिवासी विकास विभागांतर्गत ४९७ शासकीय आश्रमशाळा असून १९७८७२ इतके विद्यार्थी इ.१ ली ते इ. १२ वी मध्ये शिक्षण घेत आहेत. तसेच ५४० अनुदानित आश्रमशाळेत २४११६८ इतके विद्यार्थी इ. १ली ते इ. १२ वी मध्ये शिक्षण घेत आहेत. अपर आयुक्त, ठाणे यांचे कार्यक्षेत्रातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणु अंतर्गत असलेल्या शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, उधवा ता. तलासरी जि. पालघर या शाळेत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात कु. मिताली सुरेश चौधरी या विद्यार्थीनीने दिनांक १५.०६.२०२२ रोजी इ. ६ वी मध्ये प्रवेश घेतला होता. दिनांक २७.०६.२०२२ रोजी सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्याच्या आरोग्य विभागाने केलेल्या आरोग्य तपासणीवेळी कै. मिताली सुरेश चौधरी इ. ६ वी (अनिवासी) या विद्यार्थीनीस Tachy cardia & Anemia & Sickle Cell disease झाला असल्याचे निदान झाले होते. मात्र तिला कोणत्याही प्रकारचे औषधे लिहुन दिले नव्हते. सदर तपासणी पथकातील डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, डहाणु येथे नेण्यास सांगितले. दिनांक ०४.०७.२०२२ रोजी उपजिल्हा रुग्णालय, डहाणु येथे ज्युपिटर हॉस्पिटल, ठाणे यांच्या मार्फत Free Pediatric Cardiology screening Camp आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पमध्ये छातीत दुखणे

व Techy Cardio & Mild Anemia & Sickle Cell disease च्या उपचारासाठी कै. मिताली हीस दाखविले असता, तेथील केस पेपरवर Complaint of Chest pain & known Case of Sickle Cell असा शेरा मारुन तीचा २ D Echo करण्याबाबत केस पेपर वर नोंद केली. त्यानुसार तेथेच तीची २D Echo करण्यात आली. २D Echo च्या अहवालात सदर विद्यार्थीनी नॉर्मल आली असल्याचे नमुद केले आहे. या वेळेस तीला डॉक्टरांमार्फत कोणत्याही प्रकारचे औषध दिले गेले नाही.दिनांक ०३.१०.२०२२ रोजी सदर विद्यार्थीनी पुर्ण दिवस वर्गात होती. तिला कोणत्याही प्रकारचा त्रास जाणवत नव्हता. मात्र, दिनांक ०४.१०.२०२२ रोजी सकाळी सदर विद्यार्थीनीस ताप आल्याने शाळेच्या स्त्री अधिक्षीका यांनी तिला Paracitamol गोळी दिली. मात्र, ताप कमी न झाल्याने सकाळी १०.३० वाजता जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उधवा येथे नेले असता तिला Tablet-Dicofenac Tablet Pan ४०, Tablet-Cefixime हि औषधे देण्यात आली व उपचार करुन शाळेवर परत आणले. सदर मुलीने दुपारी जेवण, नाश्ता व रात्रीचे जेवण केले होते व दिलेल्या गोळया स्त्री अधिक्षीके समोर घेतल्या तेव्हा तिची प्रकृती सामान्य होती.

दिनांक ०५.१०.२०२२ रोजी पहाटे कै.मिताली या विद्यार्थीनीस ताप आल्याने प्राथमिक आरोग्य केंद्र, उधवा, ता. तलासरी जि. पालघर येथुन उपजिल्हा रुग्णालय, खानवेल (दादरा व नगर हवेली) येथे पुढील तातडीच्या उपचारासाठी रुग्णवाहीकेव्दारे पाठविले असल्याचे स्त्री अधिक्षीका यांनी मुलींच्या पालकांना सांगितली होते. सदर विद्यार्थीनीस खानवेल येथे नेले असता तेथे पहाटे ०६.२० वाजता या विद्यार्थीनीचा मृत्यु झाला. तेथील शवविच्छेदन अहवालानुसार कै. मिताली हीचा मृत्यु हा Cardio respiratory arrest may be due to septicemia Shock associated with pericardie effusion & pleural effusion, severe anemia, thrombocytopenia and severe splenomegaly मुळे झालेला आहे.

कै. मिताली या विद्यार्थीनीच्या मृत्युचे ऑडीट तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, तलासरी, जि.पालघर, तहसिलदार, तलासरी जि. पालघर व प्रकल्प अधिकारी, डहाणु येथील कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांनी केले आहे.

कै. मितालीस दिनांक २७.०६.२०२२ रोजीच्या तपासणीत सिकलसेल अनिमिया असल्याचे निदान झाले होते. मात्र, त्यासाठीची कोणतीही औषधे तिला दिली नसल्याचे निदर्शनास येते. आजारी पडल्यावर शालेय प्रशासनाने मितालीवर आरोग्य केंद्रात नेऊन उपचार केले त्यामुळे शालेय प्रशासनाने कोणताही हलगर्जीपणा केलेला दिसुन येत नाही. वेळेवर दवाखान्यात नेले मात्र उपचाराला प्रतिसाद मिळाला नाही. मितालीचा मृत्यु सिकलसेल व अनिमिया यामुळे झाला असल्याने मृत्यु अहवालातुन दिसुन येते प्रथम दर्शनी शालेय प्रशासनाची चुक दिसुन येत नाही. त्यामुळे दोषारोप ठेवता येत नसल्याचे प्रकल्प अधिकारी, डहाणु यांच्या तपासणी अहवाल नमुद केले आहे. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे होणारे मृत्यु टाळता येण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत.

१. पालक विद्यार्थ्यांस दवाखान्यात घेऊन न जाता गावातील भगताकडे उपचारासाठी घेऊन जातात त्यामुळे मृत्यूची संख्या वाढते. त्यामुळे शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी आजारी पडल्यानंतर पालकांच्या ताब्यात न देता नजिकच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक स्वरूपात वैद्यकीय उपचारासाठी तात्काळ घेवून जाण्यात येते.
२. आश्रमशाळांवर आपत्कालीन घटना झाल्यास प्रथमोपचार पेटी ठेवण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांच्या आजारपणात प्राथमिक उपचारासाठी सिकरूम उपलब्ध असून तेथील प्रथमोपचार करण्याबाबत आरोग्य विभागामार्फत शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येईल.

३. राष्ट्रीय बाल आरोग्य कार्यक्रम व आश्रमशाळेकरिता नियुक्त आरोग्य पथकामार्फत नियमित आरोग्य तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

४. तातडीच्या उपचारासाठी शाळा व्यवस्थापन समिती अंतर्गत १ लाख रूपये निधी विद्यार्थ्यांच्या औषधोपचारासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

५. विभागाच्या सुधारित आकृतिबंधामध्ये सर्व प्रकल्प कार्यालयांतर्गत प्रत्येक १ याप्रमाणे ३० वैद्यकीय अधिकारी व प्रत्येक आश्रमशाळेत १ याप्रमाणे ४९९ वैद्यकीय अधिसेविका इतकी पदे बाहयस्त्रोताद्वारे घेण्यात मान्यता देण्यात आलेली आहे. सदर पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

६. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या शुद्ध पाण्याची उपलब्धता व्हावी म्हणून बहुतांश शाळांमध्ये RO/वॉटर फिल्टर्स बसविण्यात आलेले आहेत.

७. शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील प्रवेशित विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यास त्यांना रु. २.०० लक्ष सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात येते. शासकीय आश्रमशाळेतील मृत विद्यार्थ्यांच्या पालकांना वितरीत होणारे रु.२.०० लक्ष सानुग्रह अनुदान हे आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येते, व अनुदानित आश्रमशाळेतील मृत विद्यार्थ्यांच्या पालकास रु.१.०० लक्ष आदिवासी विकास विभागामार्फत व रु.१.०० लक्ष संस्थेमार्फत अदा केले जाते.

८. डॉ. सुभाष साळूंखे, सेवानिवृत्त महासंचालक, आरोग्य सेवा यांच्या समितीने सुचविलेल्या शिफारशीचे अनुषंगाने शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये कार्यवाही करण्यात येत आहे. अपर आयुक्त कार्यालयातील व प्रकल्प कार्यालयातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत वारंवार शाळांना भेटी देवून सोयी - सुविधांची पाहणी करण्यात येत आहे. ज्या आश्रमशाळांमध्ये सोयी-सुविधांबाबत त्रूटी असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ शासकीय आश्रमशाळांच्याबाबतीत संबंधित शाळा मुख्याध्यापक व अनुदानित आश्रमशाळांबाबतीत संस्था चालकांना पत्र देवून सोयी-सुविधांची पूर्तता करण्याबाबत सूचना देण्यात येतात.

**************************

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री.कुणाल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३५ पुढीलप्रमाणे आहे :-

" धुळे जिल्ह्यातील गरीब, गरजू रुग्णांची धुळे शहरातील चक्करबर्डी येथील हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्वोपचार रुग्णालयावर भिस्त असणे, या रुग्णालयात धुळे जिल्ह्यातील आजूबाजूच्या परिसरातील व इतर जिल्ह्यांमधील रुग्ण मोठ्या प्रमाणावर उपचारासाठी येणे, मात्र या रुग्णालयात अनेक सुविधांचा अभाव असणे, सिटीस्कॅन, एमआरआय मशीन उपलब्ध नसणे, जे मशीन आहे तेही धूळखात बंद पडलेल्या अवस्थेत असणे, त्यामुळे गरीब, गरजू रुग्णांना खाजगी ठिकाणी जाऊन सिटीस्कॅन, एमआरआय करण्यासाठी जास्तीचे पैसे मोजावे लागत असणे, त्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय निर्माण होणे, सोनोग्राफी करण्यासाठी महिलांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत असणे, त्यामुळे त्यांचे अतोनात हाल होणे, या रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर्स, नर्स, परिचारक, शिपाई यांची शेकडो पदे रिक्त असणे, त्यामुळे आहेत त्या कर्मचा-यांवर जास्तीचा भार दिलेला असणे, रुग्णालय परिसरात मोठ्या प्रमाणावर कचराकुंडीचे स्वरुप प्राप्त झालेले असून मोकाट कुत्री वराहचा मुक्त संचार दिसून येणे, जैविक कच-याचे उघड्यावर विल्हेवाट केले जात असल्याचे निदर्शनास येणे, वार्डामध्ये दुर्गंधी व घाणीचे साम्राज्य निर्माण झालेले असून रुग्णांच्या सोबत येणारे नातेवाईक यांनाही तोंडाला रुमाल बांधून फिरावे लागणे, रुग्णालय परिसरात रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दूरावस्था झालेली असणे, त्यामुळे नागरिकांचे प्रचंड प्रमाणात हाल होणे, परिणामी सामान्य नागरिकांमध्ये शासनाप्रति मोठ्या प्रमाणावर असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले असून धुळे येथील हिरे शासकीय वैद्यकीय रुग्णालयाच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

मा.मंत्री वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांचे निवेदन

श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच सर्वोपचार रुग्णालय, धुळे या संस्थेची स्थापना १९८९ या वर्षी झालेली असून सदर महाविद्यालयास संलग्न असलेले स्वतंत्ररित्या सर्वोपचार रुग्णालय, माहे मार्च-२०१५ पासून चक्करबर्डी परीसरात स्थलांतरीत करण्यात आले.

श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे नाशिक, जळगांव, नंदुरबार तसेच महाराष्ट्र सिमेलगतचा गुजरात व मध्यप्रदेशाचा भाग येथून रुग्ण येतात. या सर्व भागातून मोठ्या प्रमाणात येणाऱ्या रुग्णांना बाह्यरुग्ण सेवा, आंतररुग्ण सेवा तसेच तातडीच्या रुग्णसेवा पुरविण्यात येतात.

सदर रुग्णालयात स्थापित करण्यात आलेले सी.टी.स्कॅन यंत्र हे सन २००६-२००७ या वितीय वर्षांत खरेदी करण्यात आलेले आहे. सदर यंत्र १५ वर्षे जुने झालेले आहे. त्यामुळे केंद्र शासनाच्या ११ व्या पंचवार्षिक योजनेंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या श्रेणीवर्धन योजनेतंर्गत सी.टी.स्कॅन यंत्र खरेदीस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून सदर यंत्रसामुग्री खरेदी करीता हाफकीन महामंडळाकडून निविदा प्रक्रिया सुरु आहे.

सद्यस्थितीत रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना सी.टी.स्कॅन तपासणीकरीता खाजगी रुग्णालयाकडे पाठविण्यात येत नाहीत. तसेच आवश्यकता भासल्यास किंवा सी.टी.स्कॅन यंत्र बंद पडल्यास रुग्णांना जिल्हा सामान्य रुग्णालय, धुळे येथे उपलब्ध असलेल्या सी.टी.स्कॅन यंत्राद्वारे तपासणीकरीता पाठविण्यात येते. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही व त्यांना जास्तीचे पैसे मोजावे लागत नाहीत.

तसेच महाविद्यालयासाठी सी.टी.स्कॅन व 3 TESLA MRI MACHINE WITH TURN KEY मशिन रुग्णहिताचा दृष्टीने व रुग्णालयांमध्ये रुग्णांची वाढती संख्या व यंत्रणेवर येणारा ताण याकरीता बाहयस्त्रोतामार्फत घेता येईल किंवा कसे याचीही चाचपणी करण्यात येत आहे. सद्यस्थितीत श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथील क्ष-किरणशास्त्र विभागामध्ये २ सोनोग्राफी मशिन कार्यान्वीत आहेत. त्यामुळे रुग्णाची गैरसोय होत नाही.

तसेच वर्ग-१ ते वर्ग-३ ची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही लोकसेवा आयोगामार्फत तसेच संचालनालय स्तरावर सुरु असून वर्ग-४ ची पदे भरण्याबाबत संबंधित जिल्ह्यांच्या निवड समितीकडे मागणीपत्र पाठवून पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याचबरोबर पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. रिक्तपदे नियमित स्वरुपात भरेपर्यंत, रुग्णहित व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता, प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे ही कंत्राटी पद्धतीने भरण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे गट-ब या संवर्गातील १२० दिवसांकरीता सहाय्यक प्राध्यापकांची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येतात.

धुळे येथील रुग्णालयास संरक्षक भिंत उभारणीकरीता निधी मंजूर असून सद्यस्थितीत आजपावेतो संस्थेच्या नावावर जागा नसल्यामुळे जागा नावावर करण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडून सुरु आहे. जागा नावावर होताच संरक्षक भिंत उभारण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांचेकडून सत्वर करण्यात येईल. तसेच रुग्णालयाच्या अंतर्गत रस्त्यांकरीता निधी मंजूर करण्यात आलेला असून सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे लवकरच कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

सदर रुग्णालयात निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची कुठल्याही प्रकारे उघड्यावर विल्हेवाट लावण्यात येत नाही. त्याचे संकलन करुन त्याची विल्हेवाट लावण्याकरीता मे. सिध्दीविनायक एंटरप्राईजेस, नंदुरबार यांना आदेश निर्गमीत करण्यात आले असून कंत्राटदार कंपनी दररोज जैविक कचरा परिसरातून उचलून त्याची विल्हेवाट लावण्याचे काम करत आहे. तसेच श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे उपलब्ध असलेल्या चतुर्थश्रेणी संवर्गातील सफाई कर्मचाऱ्यांकडून रुग्णालयीन कक्षांची नियमीतपणे स्वच्छता करण्यात येत आहे. त्यामुळे रुग्ण कक्षांमध्ये दुर्गंधी व घाणीचे साम्राज्य पसरलेले नाही.

-------------

<u>लक्षवेधी सूचना क्र. १०१४</u>

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन- २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन**

**श्रीमती ऋतुजा लटके, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १०१४ पुढील प्रमाणे आहे :-**

"मुंबईतील अंधेरी (पूर्व) विधानसभा क्षेत्रामध्ये महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित येणारी पॉकेट क्र ६ ही मिळकत मेसर्स हबटाऊन लि. यांना झोपडपटटी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकास करण्याकरिता हस्तांतरित केलेली असणे, सदर विकासकाने सदर भूखंडावर विक्रीकरिता इमारतीचे प्राधिकरणाने ४ वर्षापूर्वी बांधकाम थांबविण्याची दिलेली नोटिस, सदर नोटिसाला न जुमानता इमारतीचे पूर्ण केलेले बांधकाम, तसेच ताबा प्रमाणपत्रही न घेता तळमजल्यावरील योजनेतील लोकांना दयावयाचे २४ व्यावसायिक गाळे हे योजनेशी संबंधित नसलेल्या लोकांना परस्पर विक्री केलेले असणे, सदर गाळे विक्री झाल्याबाबत माहिती संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना असतांनाही त्यांनी कोणतीच कारवाई न होणे, तसेच मुंबई शहरामध्ये वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष हे मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त असून मुंबई शहरात कोणतेही वृक्ष छाटणे किंवा स्थलांतरीत करणे याकरिता सर्व प्राधिकरणांना मुंबई वृक्ष प्राधिकरणाची मंजूरी घेणे आवश्यक असतांनाही ती न घेता वृक्ष तोड करणे, सदर प्रकरणाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी दिनांक ५ मे, २०२२ रोजी उपअभियंता, मरोळ उपविभाग, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, अंधेरी, पूर्व यांच्याकडे तक्रार करणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व या गैरप्रकारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका ."

<u>मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन</u>

मऔवि महामंडळाने मरोळ येथे सुमारे १२७ हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक क्षेत्र विकसीत केले आहे. या क्षेत्रामध्ये सुमारे ९ मोकळ्या भूखंडावर झोपड्यांचे अतिक्रमण झालेले हाते, त्यामुळे झोपड्यांचे पुनर्वसन करण्याचे ठरविण्यात आले. त्याअनुषंगाने मऔवि महामंडळाने दि. २२/११/१९९३ च्या २२६ व्या सभेत मरोळ औद्योगिक क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्विकास योजना राबविण्याचा व त्यासाठी विकासक नेमण्याचा निर्णय मऔवि महामंडळाने घेतला.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कामासाठी जागातिक निविदा (Global Tenders) मागविण्यात आल्या. निविदेतील मुख्य तरतुदीनुसार मे. आकृती निर्माण लिमिटेड यांची विक्री करावयाच्या क्षेत्राच्या २२.५ टक्के क्षेत्र महामंडळास हस्तांतरीत करण्याची सर्वात जास्त बोलीची निविदा मऔवि महामंडळाने मंजूर केली. मे. आकृती निर्माण लिमिटेड यांना करारनामा क्र. सी-१ सन १९९५ - ९६ अन्वये दि. २६/१०/१९९५ रोजी काम सुरू करण्याचे कार्यादेश देण्यात आले.

आजमितीस सदर योजनेत पुनर्वसन करावयाच्या एकूण ४८९० झोपडीधारकांपैकी ४२०० पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात आले असून योजनेचे ८३% काम पूर्ण झालेले असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

सदर योजनेअंतर्गत पात्र झोपडीधारकांचे भाडे थकीत केल्यामुळे विकासकाच्या पॉकेट क्र. ६ येथील इमारतीचे बांधकाम बंद करण्यासाठी मऔवि महामंडळाने दि. ०४/१०/२०१९ च्या नोटीसीव्दारे विकासकास आदेशित करण्यात आले होते. तथापि, आजमितीस सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सबब, या योजनेचे पुनर्वसनाचे काम परिपूर्ण झाल्यानंतर तसेच मऔवि महामंडळास देय असलेले क्षेत्रफळ मऔवि महामंडळास प्राप्त झाल्यानंतरच विकासकाच्या विक्री करावयाच्या उर्वरीत घटकास भोगवटा प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

मरोळ औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत विकासकाने केलेल्या अनियमिततेबाबत वरिष्ठ पातळीवर वेळोवेळी बैठका घेऊन विकासकाने केलेल्या अनियमितता सुधारण्यासाठी मुदत देण्यात आली होती. तथापि, बैठकीत ठरल्याप्रमाणे विकासकाने कोणतीही कामे विहीत मुदतीत पुर्ण केली नाहीत. ही बाब मऔवि महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या बैठकीत सविस्तरपणे सादर करण्यात आली.

सदर प्रस्तावास मऔवि महामंडळाच्या दि. २७/१२/२०२२ रोजीच्या सदस्य मंडळाची बैठक क्र. ३९४ नुसार मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने विकासकाने परस्पर वाटप केलेल्या सदनिकांचे सर्वेक्षण करतेवेळी Video चित्रीकरणाद्वारे घुसखोरी झालेल्या सदनिकांचे सर्वेक्षण करुन, घुसखोरांना नोटीस बजावून त्याची प्रत विकासकास कार्यवाहीकरीता देऊन घुसखोरी झालेल्या सदनिका पोलिस सुरक्षेसह विकासकामार्फत रिक्त करणे याकरीता विकासकास ०३ महिन्यांच्या कालावधी देणे व विकासक या कालावधीत घुसखोर काढण्यास असमर्थ ठरल्यास ०३ महिन्यांनंतर विकासक व घुसखोर यांच्यावर FIR दाखल करण्यात येईल. या सर्व बाबींचा समावेश करुन विकासकास कार्यकारी अभियंता, विभाग क्र. १ यांनी दि. ३०/०१/२०२३ अन्वये पत्र देण्यात आलेले आहे.

तद्नंतर विहीत केलेल्या कालावधीत जर विकासक असमर्थ ठरल्यास, या योजनेत बांधकामाधीन असलेल्या व सोडतीकरीता उपलब्ध असलेल्या सदनिकांमधील घुसखोरी प्रतिबंधीत करण्यासाठी मऔवि महामंडळामार्फत सुरक्षा रक्षक तैनात करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

पॉकेट क्र. ६ येथील विकासकाच्या विक्री करावयाच्या इमारतीच्या तळमजल्यावरील पात्र झोपडपट्टीधारकांसाठी राखीव असलेल्या गाळ्यांमध्ये विकासकाने परस्पर वाटप केल्याचे निदर्शनास आल्यानंतर विकासकास सदरहू प्रकरणी सविस्तर अहवाल सादर करणेबाबत मऔवि महामंडळामार्फत कळविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने विकासकाने दि. १३/०३/२०२३ रोजी पर्किट क्र. ६ मधील ३० गाळेधारकांची यादी मऔवि महामंडळास सादर केली आहे. सदर वाटप यादीनुसार गाळ्यांचे संयुक्त सर्वेक्षण करुन त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येणार आहे.

मऔवि महामंडळाच्या मरोळ औद्योगिक क्षेत्रातील अखत्यारीत येणाऱ्या भूखंडावरील इमारतींच्या परिसरातील वृक्षांचे निर्मूलन, वृक्ष छाटणी, झाडांच्या फांद्यांची छाटणी करीता महामंडळाचे दि. ०३/०८/२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार वृक्ष प्राधिकरण म्हणून मऔवि महामंडळातर्फे परवानगी देण्यात येते.

विकासकामार्फत पॉकेट क्र. ६ येथील विक्री करावयाच्या इमारतीसमोरील ०२ झाडे तोडण्याकरीता प्रस्ताव मऔवि महामंडळास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाची छाननी

केल्यानंतर नियमानुसार पॉकेट क्र. ६ वरील झाडे तोडण्यासंदर्भात जाहीर नोटीस पुढारी वृत्तपत्रात दि. २९/०४/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर नोटीसीच्या अनुषंगाने ०४ व्यक्ती व ०१ संस्थेची वृक्ष तोडीस हरकत मऔवि महामंडळास प्राप्त झाली होती. सदर हरकतीच्या अनुषंगाने प्रस्तावित सुनावणीबाबत विकासकाचे प्रतिनिधी यांना दूरध्वनी व ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते. तथापि, विकासकाने परवानगीची वाट न पाहता दोन्ही झाडे तोडल्याचे निदर्शनास आले. सदरहू विकासकास दि. १४/०६/२०२२ च्या ईमेल द्वारे स्पष्टीकरण मागण्यात आले आहे. यासंदर्भात मान्यता घेऊन दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे.

मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. २७/१२/२०२२ च्या ३९४ व्या बैठकीतील ठरावानुसार मऔवि महामंडळाने संयुक्तपणे घुसखोरी झालेल्या सदनिकांची दि. २८/०३/२०२३ पासून पाहणी सुरु केली असून संबंधितांना १५ दिवसात कागदपत्रे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मऔवि महामंडळामार्फत संपूर्ण सर्वेक्षण झाल्यानंतर व कागदपत्रांची छाननी झाल्यानंतर यथोचित कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने मऔवि महामंडळाने कार्यवाही सुरु केलेली आहे.

************************

# विधानसभा
## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१९३५**

श्री. जितेश अंतापूरकर विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

---

"देगलूर (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालयात मनीषा शिंदे या महिलेचा डॉक्टराच्या हलगर्जीपणाने कुटुंब नियोजन व प्रसूतीच्या वेळी मृत्यू झाल्याची घटना दि. २० डिसेंबर २०२२ रोजी घडली असणे, सदरील मृत्यू डॉ.ठक्करवाड यांच्या हलगर्जीपणामुळे झाला असल्याचा आरोप करीत त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन सेवेतून कायमचे बडतर्फ कडक कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व कुटुंबीयांसह स्थानिक नागरिकांची उपजिल्हाधिकारी कार्यालय, देगलूर येथे दि. ३० डिसेंबर २०२२ रोजी काढण्यात येणे, डॉ.ठक्करवाड यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने चौकशी समिती गटीत करुन या समितीच्या अहवालातील मजकुराचा बोध होत नसल्याने सदरील स्वयंस्पष्ट अहवाल देगलूर पोलिसांनी संबंधित विभागाकडे परत पाठविला असणे, परंतु याप्रकरणी कोणतीच कारवाई होत नसल्याने जनमानसात पसरलेला असंतोष व चिडीची भावना, परिणामी शासनाने याप्रकरणी तातडीने मनीषा शिंदेच्या मृत्य प्रकरणातील डॉ.ठक्करवाड दोषीवर कडक कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया.."

---

मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

दि.१६.१२.२०२२ रोजी श्रीमती. मनीषा प्रभाकर शिंदे या महिलेस उपजिल्हा रुग्णालय, देगलूर, जि. नांदेड येथे प्रसूतीकरिता दाखल करण्यात आले होते. सदर रुग्णाची सिजेरीन शस्त्रक्रियेद्वारे प्रसूती करण्यात आली होती. तद्नंतर गुंतागुंत निर्माण झाल्यामुळे सदर रुग्णास डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड येथे संदर्भित करण्यात आले होते. सदर रुग्णाचा दि.२०.१२.२०२२ रोजी मृत्यू झाला आहे. मयत रुग्णाचे पति श्री. प्रभाकर बबनराव शिंदे तळणी, ता. बिलोली, जि.नांदेड यांनी त्यांची पत्नी नामे श्रीमती. मनीषा प्रभाकर शिंदे हिच्या मृत्यूस वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, देगलूर यांचा निष्काळजीपणा कारणीभूत आहे या आशयाची तक्रार पोलीस स्टेशन, देगलूर येथे दाखल केली आहे. तसेच या महिलेच्या मृत्यू प्रकरणी जबाबदार असणाऱ्या डॉ. प्रदीप मारोतराव ठक्करवाड यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून सेवेतून कायम बडतर्फ करून शिंदे कुटुंबीयास न्याय मिळवून द्यावा, असे निवेदन उपजिल्हाधिकारी, देगलूर यांच्याकडे दि. २६.१२.२०२२ रोजी प्राप्त झाले होते.

सदर प्रकरणाची चौकशी करण्याकरिता पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, देगलूर यांनी दि. २६.१२.२०२२ च्या पत्रानुसार अधिष्ठाता, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय

महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड यांना कळविले होते. शासकीय महाविद्यालयाच्या गठीत समितीद्वारे चौकशी करण्यात आली असून सदर चौकशी अहवालानुसार मयत श्रीमती. मनीषा प्रभाकर शिंदे हिच्यावर उपजिल्हा रुग्णालय, देगलूर येथे सिजेरीन शस्त्रक्रियेमध्ये गुंतागुंत निर्माण झाली होती त्या गुंतागुंतीमुळे रुग्णाच्या पोटात रक्तस्राव होण्यास सुरू झाला व त्याची लक्षणे दिसत होती. अश्यावेळेस अचूक निदान, तातडीने औषधउपचार देणे व रुग्णास पुढील उपचाराकरिता हायर सेंटरला संदर्भित करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत प्रकरणी योग्य निदान व तातडीने औषधउपचार करण्याकरिता १० ते १२ तासाचा विलंब झाल्याचे व डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड येथे संदर्भित करण्यास विलंब झाला असल्याचा अभिप्राय सदर चौकशी समितीने दि.१३.०१.२०२३ रोजी दिला होता. सदर मृत्यु बाबत पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, देगलूर यांनी स्वस्पष्ट चौकशी अहवाल मिळणेबाबत कळविले असता सदर चौकशी समितीने त्यांचे पत्र दि.२०.०२.२०२३ अन्वये प्रस्तुत प्रकरणी मयत श्रीमती. मनीषा प्रभाकर शिंदे हिच्यावर शस्त्रक्रिया करणारे स्त्रीरोग तज्ञ डॉ. पी. एम. ठक्करवाड, वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून सदर रुग्णावर उपचार करताना निष्काळजीपणा झाला असल्याचे निदर्शनास येते, असे चौकशी समितीचे मत असल्याचा अहवाल सादर केलेला आहे.

सदर प्रकरणी जिल्हा माता मृत्यू अन्वेषण समितीद्वारे सदर माता मृत्यू चे अन्वेषण करण्यात आले असून त्यानुसार सदर माता मृत्यूस Type-I व Type- III या प्रकारचे विलंब जबाबदार असल्याचा अहवाल सादर केलेला आहे. सदर अन्वेषण अहवालानुसार गरोदर माता व तिच्या कुटुंबियाकडून (Type-I) व औषधोपचारात संस्था स्तरावरून सुद्धा विलंब झाला असल्याचा (Type-III) माता मृत्यू अन्वेषण समितीने अहवाल दिलेला आहे.

पोलीस स्टेशन, देगलूर येथे डॉ. प्रदीप ठक्करवाड यांच्या विरुद्ध गु.र.न.क्र. ११४/२०२३ अन्वये भा.दं.वि. कलम ३०४ अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू असून तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायलयात दोषारोप पत्र दाखल करण्यात येणार आहे. प्रस्तुत प्रकरणी डॉ. प्रदीप ठक्करवाड, वैद्यकीय अधिकारी, उप जिल्हा रुग्णालय, देगलूर जि. नांदेड हे जबाबदार असल्यामुळे त्यांच्या विरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे योजले असून त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ चा भंग केल्याने, त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या नियम ०४ (१)(अ) मधील तरतूदीनुसार दि. ०५.०६.२०२३ च्या आदेशानुसार निलंबीत करण्यात आले आहे.

***********************************************

लक्षवेधी सूचना क्रमांक.२४७०

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री.रवि राणा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक २४७० पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्याचे विद्यमान सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री यांना त्यांच्या मंत्रालयातील कक्षामध्ये अमरावती जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक २६५२ आय.पी. २०२२, दिनांक ०१/०३/२०२३ रोजीनुसार लेखी तक्रार देऊन अमरावती जिल्ह्यातील अनेक कर्मचारी यांनी सक्षम प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या विरोधात तक्रारी असल्याचे दिनांक १ मार्च, २०२३ रोजी वरील पत्राद्वारे कळविले असणे ज्यामध्ये सक्षम लिमिटेड कंपनीचे दिनांक ३/११/२०२० रोजी च्या दरम्यान शासनाचे कार्यकारी यंत्रणेकडून शासकीय सुपरस्पेशलिटी व इतर रुग्णालयात मनुष्यबळ पुरवठा यासाठी कंत्राट दिला असणे ज्या कंत्राट यामध्ये स्थानिक युवकांना युवतींना रोजगार मिळाला नसून जिल्ह्याचे बाहेरून युवक- युक्तींकडून आर्थिक व्यवहार करून घेऊन त्यांना कामावर घेऊन त्यांच्याकडून रुग्णालयातील कामे केले जात असणे, हजेरी पटावरील कर्मचारी व प्रत्यक्षात काम करणाऱ्यांमध्ये संख्येत खूप तफावत असणे व यामध्ये गैरव्यवहार केला जात असणे कर्मचाऱ्यांच्या ESIC/ EPF मध्ये मिळणाऱ्या सवलती डावलून शासनाचे व कर्मचाऱ्यांचे लाख रुपयाचे नुकसान सक्षम प्रायव्हेट लिमिटेड कंपनी कडून होत होत असणे. सर्रास वरील प्रकार सुरू असून अमरावती जिल्ह्यातील युवकांमध्ये सक्षम प्रा. लिमिटेड कंपनी विरोधात रोष निर्माण झाला असणे, या गंभीर विषयात शासनाने वेळीच तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता असणे, सक्षम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला शासनाच्या आदेशाने उपसंचालक आरोग्य सेवा अकोला यांचे आदेश पत्र क्रं.४०९०/२०२१, दिनांक ०३/११/२०२० रोजी अकोला मंडल अंतर्गत अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ या जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील कामे करण्यासाठी वरील कंपनीने मनुष्यबळ पुरविले असणे यांचे कामाप्रती नेहमीच शासनाकडे तक्रारी होत असणे, वरील विषयात शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन सुरुवातीपासून ते आतापर्यंत सक्षम प्रायव्हेट लिमिटेडद्वारे केलेल्या कामाची चौकशी होऊन जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत शासनाकडून सदर कंत्राटदाराची कोणतीही देयक अदा करण्यात येऊ नये तसेच सदर कंपनीवर कारवाई करून कंत्राट रद्द करून सदर कंपनीला काळ्या यादित टाकण्यासाठी निर्णयात्मक आदेश काढण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची यासंबंधी भूमिका व प्रतिक्रिया. "

---

मा.प्रा.डॉ.तानाजी सावंत, मंत्री (सार्वजनिक आरोग्य विभाग आणि कुटुंब कल्याण) यांचे निवेदन :-

सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र पदनि-२०१२/प्र.क्र.२४९/आ-३, दि.१३.८.१९ ने राज्यात नव्याने करण्यात आलेल्या व श्रेणीवर्धीत केलेल्या आरोग्य संस्थासाठी काल्पनिक कुशल व अकुशल पदांची निर्मिती व येणाऱ्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदरहू प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने आयुक्तालयाने दिनांक १९.८.१९ नुसार सदर पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला यांना कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांचे स्तरावरुन उद्योग व उर्जा शासन निर्णय दिनांक १ डिसेंबर २०१६ नुसार कार्यवाही करुन पंचसूत्री पालन करुन ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आलेली होती.

सदरच्या ई. निविदेला केंद्रीय खरेदी समिती, मुंबई यांची मान्यता प्राप्त करुनच मे. सक्षम फॅसिलीटी सर्व्हीसेस प्रा.लि.मुंबई यांना अधिनस्त खालील संस्थांमध्ये विविध कंत्राटी कुशल व अकुशल कर्मचारी पुरविण्याकरीता कार्यादेश निर्गमित करण्यात आले.

| अ.क्र | संस्था | कंत्राटी कशल व अकुशल कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| १. | विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती (टप्पा-२) | १०३ |
| २. | ग्रामीण रुग्णालय भातकुली, जि. अमरावती | ११ |
| ३. | ट्रॉमा केअर युनिट, तिवसा, जि. अमरावती | ४ |
| ४. | ट्रॉमा केअर युनिट, नांदगाव खांडेश्वर, जि.अमरावती | ४ |
| ५. | जिल्हा स्त्री रुग्णालय, वाशिम | ४३ |
| ६. | जिल्हा स्त्री रुग्णालय, बुलढाणा | ४७ |
| ७. | जिल्हा स्त्री रुग्णालय, यवतमाळ | ३ |
| ८. | जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला | ४ |
| ९. | स्त्री रुग्णालय, अचलपूर, जि. अमरावती | ४१ |
| १०. | जिल्हा रुग्णालय, कारंजा, जि.वाशिम | ३५ |
| ११. | ट्रॉमा केअर युनिट, राळेगाव, जि. यवतमाळ | ४ |
| १२. | ट्रॉमा केअर युनिट, दारव्हा, जि. यवतमाळ | ४ |
| १३. | ट्रॉमा केअर युनिट, वणी, जि. यवतमाळ | ४ |

उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला यांचे स्तरावरुन सदरहू निविदा प्रक्रीया राबवित असताना ई. निविदेमध्ये सहभागी निविदाधारक सेवा पुरवठादाराला नियमानूसार ईपीएफ, ईएसआयसी कर्मचारी कल्याण निधी, ईत्यादीचा भरणा करणे बंधनकारक राहणार असल्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. त्याप्रमाणे मे. सक्षम फॅसिलीटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई कडून प्राप्त प्रतिमाह देयकासोबत संबंधीत कंत्राटी कर्मचा-यांचे ईपीएफ, ईएसआयसी चा भरणा केल्याचे चालान प्राप्त झाल्याशिवाय संबधीत कंपनीचे देयके पारीत करण्यात येत नाहीत. तसेच याबाबत कोणत्याही व्यक्ती अथवा लोकप्रतिनिधी यांचेकडून तक्रार प्राप्त नाही.

तसेच मे. सक्षम फॅसिलीटी सर्व्हीसेस प्रा.लि. मुंबई यांचेकडुन पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे बहुतांश संबंधीत जिल्हयातीलच रहीवासी आहेत व त्यांचे कडून आर्थिक व्यवहार करुन काम करुन घेत जात असल्याची कोणतीही तक्रार व्यक्ती अथवा लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त नाही.

तसेच हजेरीपटावरील कर्मचारी व प्रत्यक्षात काम करणारे कर्मचारी याबाबतीत गैरव्यवहार होत असल्याची बाब या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही व संबंधीत कंपनीचे देयके हे सुध्दा हजेरीपटाप्रमाणेच अदा करण्यात येते.

-----------------------------------

लक्षवेधी सूचना क्रमांक-३२०

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्रीमती नमिता मुंदडा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. ३२० पुढीलप्रमाणे आहे:-

"बीड जिल्ह्यातील जवळपास सर्वच गटशिक्षण अधिकारी कार्यालयात विजेचे कनेक्शन असणे. परंतु वीज बिलासाठी सन २०१२ पासून जिल्यातील गटशिक्षण अधिकारी कार्यालयांना शासनाकडून निधी देण्यात येत नसणे, वीज बिल न भरल्यास विद्युत पुरवठा खंडित करण्यात येत असल्याने उक्त कार्यालयात कार्यरत कर्मचारी आपआपसात वर्गणी जमा करून विजेचे बिल भरत असणे, त्यामुळे नाहक कर्मचाऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असणे, त्यामुळे वीजबिलासाठी बीड जिल्ह्यातील गटशिक्षण अधिकारी कार्यालयांना निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

### श्री. दिपक केसरकर, मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन

समग्र शिक्षा अंतर्गत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयांतर्गत गटसाधन केंद्रांना अनुदाने वितरित करण्यात येतात. त्याचप्रमाणे गटशिक्षण अधिकारी कार्यालयातील सादील अनुदानातून आवश्यक स्टेशनरी, झेरॉक्स खर्च, वीज बील, आकस्मिक खर्च, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीचा खर्च व इतर खर्च भागविण्यात येतो. याकरिता महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयाच्या परिपत्रकान्वये मार्गदर्शन सुचनांनुसार जिल्हा कार्यालयाकडून अधिनस्त गट/ शहर समुह साधन केंद्रस्तरावर निधी वितरित करून खर्चाबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या जातात.

बीड जिल्ह्यातील सर्वच गटसाधन केंद्रांना स्वतंत्र इमारत असून त्यासाठी विद्युत जोडण्या घेण्यात आल्या आहेत. याकरिता सन २०१२ पासून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई या कार्यालयामार्फत अधिनस्त गटशिक्षणाधिकारी कार्यालयांना सादील खर्चासाठी PFMS प्रणालीद्वारे निधी वितरित करण्यात येतो. तथापि, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात PFMS प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे अंबाजोगाई, वडवणी व शिरूर वगळता अन्य तालुक्यांना सादील निधीतून खर्च करता आला नसल्याने सदर निधी मार्च २०२२ अखेर व्यपगत झाला.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या कार्यालयामार्फत सन २०२२-२३ करिता सादील खर्चासाठी प्रती गटसाधन केंद्राकरिता रु. ५८,२००/- या प्रमाणे एकूण रू.६,९८,४००/- इतका निधी केंद्र स्तरावर वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीतून वीज देयके व इतर अत्यावश्यक सेवांवरील खर्च प्रदान करण्याबाबत दिलेल्या सूचनांनुसार बीड जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील वीज पुरवठा सुरळीत आहे.

******************

शेरा/एच-०४७५ (७५०-७-२३)

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

मा.श्री.सुभाष देशमुख ,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.

"राज्यात इयत्ता बारावीच्या परीक्षा २१ फेब्रुवारी, २०२३ तर दहावीची परीक्षा २ मार्च २०२३ पासून सुरु झालेली असणे, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने परीक्षा बाबत कठोर नियमावली जारी केलेली असणे, त्यावर सविस्तर प्रक्रिया उमटत असतानाच परीक्षेचे वेळापत्रकात दोन दिवस दहावी बारावी पेपर एकाच वेळी ठेवल्याने शाळा स्तरावर संभ्रमाची परिस्थिती निर्माण होणे, याबाबत शिक्षण मंडळाकडून घोळ झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होणे, शिक्षण मंडळ स्वायत्त असनाही परीक्षेच्या वेळापत्रक ठरवताना मंडळाने कोणता प्रारुप आराखडा करुन परीक्षा वेळापत्रक जाहीर करण्याची जाहीर केले हे मंडळालाच माहीत नसल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण होणे, या गोंधळास जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने तातडीने चौकशी करुन अहवाल मागवण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना"

### मा. मंत्री, शालेय शिक्षण यांनी करावयाचे निवेदन

इ.१० वी व इ.१२ वी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक दि.१९ सप्टेंबर, २०२२ रोजी राज्यमंडळाचे अधिकृत संकेतस्थळावर समाजघटकांकडून सूचना व अभिप्राय मागविण्यासाठी जाहीर करण्यात आलेले होते. निर्धारित मुदतीत राज्य मंडळाकडे प्राप्त झालेल्या सूचनांचा विचार करुन संभाव्य वेळापत्रकात बदल करुन अंतिम वेळापत्रक राज्य मंडळाकडून दि.३० डिसेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आलेले होते. अंतिम वेळापत्रक जाहीर करताना राज्यातील सर्व ३६ जिल्हयांमधील स्थानिक सुट्टयांचा व सणांचा आढावा घेण्यात येत असतो.

इ.१० वी परीक्षेसाठी राज्यातून एकुण ५०३३ परीक्षा केंद्र तसेच इ.१२ वी परीक्षेसाठी एकूण ३१९५ परीक्षा केंद्र निर्धारीत करण्यात आलेली होती. राज्यमंडळाचे धोरणानुसार इ.१० वी व इ.१२ वी परीक्षेसाठी शक्यतो एकाच इमारतीत परीक्षा केंद्र देण्यात येत नाही. परंतु अपवादात्मक परिस्थितीत एखादया ठिकाणी भौतिक सुविधा उपलब्ध नसेल तर विद्यार्थी हित लक्षात घेता दोन्ही परीक्षेसाठी एकाच इमारतीत परीक्षा केंद्र देण्यात आलेली आहेत.

मार्च, २०२३ इ.१२ वी व इ.१० वी परीक्षेच्या कालावधीत एकूण सात दिवस सदर दोन्ही परीक्षांचे पेपर एकाच दिवशी होते. इ.१० वी साठी ०८७ विषय असून, इ.१२ ची साठी १५९ विषयांची

परीक्षा आयोजित करण्यात येते. सदर विषयांची संख्या पाहता तसेच उपलब्ध कालावधीचा विचार करता प्रत्येक परीक्षेच्या वेळी साधारणपणे ७ ते ८ दिवस सदर दोन्हीही परीक्षा एकाच दिवशी आयोजित कराव्या लागतात. इ.१२ वी व इ.१० वी परीक्षा केंद्र एकाच इमारतीत असलेल्या परीक्षा केंद्राची संख्या १२७३ आहे. परंतु राज्यातील कोणत्याही परीक्षा केंद्रावरुन दोन्ही परीक्षेसाठी बैठक व्यवस्थेबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही.

माध्यमिक शालान्त (इ.१० वी) व उच्च माध्यमिक (इ.१२ वी) प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च, २०२३ अनुक्रमे दि.२ मार्च, २०२३ या कालावधीत तर दि.२१ फेब्रुवारी ते दि.२१ मार्च, २०२३ या कालावधीत संपन्न झाल्या आहेत.

इ.१० व इ.१२ वी विषयांची एकाच दिवशी एकाच वेळी असलेल्या परीक्षा राज्यभरात सुरळीत पार पडलेल्या आहेत. याबाबत कोणत्याही स्तरावर अडचण निर्माण झालेली नाही व परीक्षेच्या दिवशी बैठक व्यवस्थेबाबत गोंधळ निर्माण झालेला नाही तसेच याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

**********